# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २७.०२.२०२६

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (२१.०२.२०२६ ते २७.०२.२०२६) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२८.०२.२०२६ ते ०४.०३.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | दिनांक | | २८ | ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | | ० | ० | ० | ० | ० |
| ३३.६ | ३४.० | ३४.४ | ३४.२ | ३४.० | ३४.४ | ३४.२ | कमाल तापमान (अं.से.) | | ३५ | ३५ | ३५ | ३६ | ३६ |
| १८.२ | १८.४ | २०.२ | १९.२ | १९.४ | १६.० | १६.४ | किमान तापमान (अं.से.) | | १७ | १८ | १९ | १९ | २० |
| ० | ० | ० | ० | ० | ६ | ४ | स. | ढग स्थिती (आकाश) | १ | २ | १ | १ | ३ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | | दु. | | | | | | |
| ६० | ७३ | ७६ | ७९ | ८० | ७७ | ६५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ५७ | ६५ | ६६ | ६८ | ६१ |
| ४२ | ३९ | ४३ | ४३ | ३६ | ३६ | ३१ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | २९ | ३० | २७ | २५ | २५ |
| २.७ | २.५ | २.८ | ३.० | २.८ | ३.७ | ३.५ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | | ६ | ५ | ५ | ३ | ३ |
| ई | पू. | प. | उ.ई | वा. | वा. | नै. | स. | वाऱ्याची दिशा | वा. | प.वा. | प.वा. | वा. | वा. |
| द.आ. | द. | उ.ई | पू. | उ.वा. | प. वा. | वा. | दु. | | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ३.२ | ३.२ | १ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २८ फेब्रुवारी ते ३ मार्च दरम्यान आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची तसेच ४ मार्च रोजी आकाश अंशत: ढगाळ राहण्याची तसेच शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ४ मार्च पर्यंत कमाल तापमानामध्ये २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता असून कमाल तापमान ३५.० ते ३६.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान १७.० ते २०.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ५७ ते ६८%, दुपारची सापेक्ष आद्रता २५ ते ३०% तसेच वाऱ्याचा वेग ताशी ३ ते ६ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक १ ते ७ मार्च २०२६ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी ते सरासरी पेक्षा कमी राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी फळबागांमध्ये आच्छादनाचा वापर करावा.<br>➢ फळ तसेच भाजीपाला पिकांना पाणी देण्यासाठी शक्यतो ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा<br>➢ कमाल तापमानामध्ये वाढ होण्याची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वत:ची व आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी<br>➢ लवकर पेरणी केलेल्या व पक्व झालेल्या रब्बी ज्वारी, गहू व हरभरा पिकांची काढणी करावी. मळणी करून तयार शेतीमाची नीट वाळवून स्वच्छ व सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| संदेश | | ➢ मार्चमध्ये ऊस पिकास प्रती दिवस ६.०६ लिटर पाण्याची गरज असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४लिटरचा ड्रीपर) दररोज १ तास आणि ३१ मिनिटे चालू ठेवावा. |
| मका | काढणी व साठवणूक | ➢ धान्यासाठी मका पिकाची काढणी कणसावरील आवरण पिवळसर पांढरे आणि टणक झाल्यावर करावी. त्यासाठी ताटे न कापता प्रथम कणसे सोलून खुडून घ्यावीत आणि सोललेली कणसे २ ते ३ दिवस उन्हात चांगली वाळवावीत. त्यानंतर मका सोलणी यंत्राच्या सहाय्याने सोलणी करावी व नंतर दाण्यातील ओलावा १०-१२ टक्के होईपर्यंत दाणे उन्हात चांगले वाळवावे जेणेकरुन साठवणुकीत किडींचा प्रादुर्भाव होणार नाही. |
| रब्बी ज्वारी | दाणे भरणे ते पक्वता | ➢ पक्व होत असलेल्या ज्वारी पिकाचे पक्षांपासून संरक्षण करावे.<br>➢ ज्वारीच्या दाण्याच्या टोकाजवळ काळा ठिपक्याचे लक्षणे दिसताच ज्वारीची काढणी करावी व ८ ते १० दिवस कणसे उन्हात वाळवावीत |
| गहू | पक्वता / दाणे भरणे | ➢ लवकर पेरणी केलेल्या गहू वेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ % असावे.पिकाची कापणी पिक पक्व होण्याच्या २-३ दिवस आधी करावी त्यामुळे गव्हाचे दाणे शेतात झडण्याचा प्रकार आढळत नाही. कापणीच्या<br>➢ गहू बियाणे साठवणुकीच्या काळात सोंडेकिडीच्या नियंत्रणासाठी उन्हात वाळवलेल्या प्रती किलो बियाण्यास १० ग्रॅम याप्रमाणे वेखंड भुकटीची बीज प्रक्रिया करावी. |
| हरभरा | पक्वता | ➢ पक्व झालेल्या हरभरा पिकाची काढणी व मळणी करावी. मळणी केलेले हरभरा /धान्य उन्हामध्ये ६ ते ७ दिवस वाळवावे आणि सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावे. साठवणूक करताना त्यामध्ये ५% कडुनिंबाचा पाला घालावा त्यामुळे कीड लागत नाही. |
| भुईमुग | वाढीची | ➢ भुईमुग पिकातील सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरून काढण्यासाठी ०.५% लोह व ०.२ % झिंक सल्फेट या मिश्रणाची पेरणीनंतर ३० दिवसांनी फवारणी करावी.<br>➢ उन्हाळी भुईमूग पिकास जमिनीच्या मगदूराप्रमाणे ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| ऊस | वाढीची | ➢ ऊस तोडणीनंतर पाचट सरीत दाबून घ्यावे.<br>➢ ऊसाचे बुडखे मोकळे करून धारदार कोयत्याने जमिनीलगत छाटून घ्यावेत व छाटलेल्या बुडख्यांवर १० ग्रॅम कार्बेन्डॅझिम १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>➢ पाचट कुजविण्यासाठी पाचटावर प्रति हेक्टरी ८० किलो युरिया, १०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट टाकावे व त्यानंतर १० किलो पाचट कुजविणारे जिवाणू शेणखतात मिसळून पाचटावर टाकावे.<br>➢ पहिले पाणी दिल्यानंतर ३ ते ४ दिवसांनी वापश्यावर आल्यानंतर पहारीच्या सहाय्याने हेक्टरी १५० किलो नत्र (३२५ किलो युरिया), ७० किलो स्फुरद (४३७ किलो सिंगल सुपर फॉस्फेट ), ७० किलो पालाश (११७ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) यांचे मिश्रण तसेच प्रति हेक्टरी झिंक सल्फेट २० किलो, फेरस सल्फेट २५ किलो याप्रमाणात शेणखतात मिसळून एकत्र करून बुडख्यापासून सरीच्या एका बाजूला ३० सें.मी. अंतरावर व १५ सें.मी. खोलीवर पहारीच्या सहाय्याने द्यावीत.<br>➢ फेब्रुवारीपुर्वी तोडणी झालेल्या ऊसाचाच खोडवा राखावा. किड व काणीग्रस्त क्षेत्र असल्यास खोडवा ठेवू नये. तसेच कमीत कमी हेक्टरी १ लाख ऊसाची संख्या असलेल्या क्षेत्राचाच खोडवा ठेवावा. |
| मिरची | फुलोरा | ➢ मागील आठवड्यामध्ये कोरडे हवामान आढळल्यामुळे मिरची पिकावर फुलकिडे या किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. फुलकिडे हे पानाच्या खालच्या व वरच्या बाजूस राहतात आणि पानातील रस शोषून घेतात त्यामुळे पानाच्या कडा वरील बाजूस वळतात. पाने लहान होतात यालाच **बोकड्या किंवा चुरडा-मुरडा** असे म्हणतात. त्याच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ % एस.एल. २.५ मिली किंवा फिप्रोनिल ५ एस.सी. २० मिली. या किटकनाशकाच्या आलटून पालटून फवारण्या कराव्यात.<br>➢ फवारणी करतांना पावसाळी वातावरणामध्ये चिकट द्रव्याचा (०.१%) वापर जरूर करावा.<br>➢ शेतामध्ये निळे चिकट सापळे एकरी २० ते २५ या प्रमाणात वापरावे. |
| आंबा | फळ वाढीची | ➢ आंबा पिकामधील फळ गळ कमी करण्यासाठी उपलब्धतेनुसार प्रत्येक झाडास १०० लिटर पाणी प्रती आठवडा आंबा फळे वाटाण्याच्या ते सुपारीच्या आकाराच्या दरम्यान असताना द्यावे. आंबा फळबागेत जमिनीमध्ये ओलावा टिकविण्यासाठी आच्छादनांचा वापर करावा.<br>➢ साधारणतः अंड्याच्या आकाराच्या फळांना फळ माशीचा प्रादुर्भाव होऊ शकतो. फळगळ झालेली असल्यास पडलेली फळे गोळा करून नष्ट करावीत व रक्षक फळ माशी सापळे @ २ प्रती एकर या प्रमाणात लावावेत. |
| कलिंगड | फळ धारणा | ➢ काही ठिकाणी कलिंगड पिकावर फळ माशीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी क्ल्यु-ल्युर कामगंध सापळे एकरी ५ या प्रमाणात वापरावे. ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी.<br>➢ कमाल तापमानामध्ये आणि वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ झालेली असल्याने बाष्पीभवनाचा वेग वाढलेला आहे त्यामुळे कलिंगड पिकाची पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी आवश्यक तेवढे पाणी द्यावे. |
| पशुधन | वाढीची | ➢ लाळ खुरकुत रोगापासून बचावासाठी निरोगी जनावरांना लाळ खुरकुत रोगाची रोगप्रतिबंधक लस मार्च महिन्यामध्ये अधिकृत पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने टोचून घ्यावी. ३ महिन्याच्या आतील तसेच गाभण जनावरांना लस देणे टाळावे.<br>➢ म्हशींना घर्मग्रंथी खूप कमी असल्याने व त्यांची त्वचा काळी असल्याने वाढणाऱ्या तापमानाचा गार्यीपेक्षा म्हशींना त्रास जास्त होतो म्हणून म्हशींना पाण्यात डुंबन्यास सोडावे. |
| कुक्कुटपालन | वाढीची | उन्हाळ्याच्या आणि उष्णतेच्या काळात कोंबड्यांची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी खालील व्यवस्थापन पद्धती अवलंबाव्यात:<br>१. थंड आणि स्वच्छ पाण्याचा पुरवठा करावा<br>• स्वच्छ आणि थंड पाणी सतत उपलब्ध करून द्यावे.<br>• इलेक्ट्रोलाइट्स आणि जीवनसत्त्वे (जसे की जीवनसत्त्व C) पाण्यात मिसळून द्यावीत, जेणेकरून उष्णतेचा ताण कमी होईल.<br>• पोल्ट्री शेडमध्ये अतिरिक्त पाण्याचे भांडे ठेवा.<br>२. योग्य वायुवीजन आणि उष्णतेचे नियमन करा<br>• पोल्ट्री शेडमध्ये योग्य वायुवीजन असावे, जेणेकरून स्वच्छ हवा खेळती राहील.<br>• फॅन, फवारे किंवा धुके निर्माण करणारी यंत्रे वापरून वातावरण थंड करावे.<br>• गर्दी टाळा, कारण त्यामुळे शरीराची उष्णता वाढते आणि ताण येतो.<br>३. खाद्य वेळेप्रमाणे द्या<br>• खाद्य थंड हवामानात, म्हणजे सकाळी लवकर आणि संध्याकाळी उशिरा द्यावे.<br>• उच्च-ऊर्जायुक्त खाद्य कमी करून फायबरयुक्त आणि सहज पचणारे खाद्य द्यावे.<br>• उष्णतेचा ताण कमी करण्यासाठी इलेक्ट्रोलाइट्स आणि खनिजे आहारात मिसळावीत.<br>४. सावली आणि थंड वातावरण तयार करा<br>• तापमान कमी करण्यासाठी शेडनेट्स, झाडे किंवा गवताचे छप्पर वापरावे.<br>• जमिनीवर आणि छतावर थंड पाणी फवारावे.<br>• थेट सूर्यप्रकाश रोखण्यासाठी ओले गोणीचे पट्टे किंवा पडदे लावावेत.<br>५. आच्छादन आणि स्वच्छता व्यवस्थापन<br>• आच्छादन कोरडे आणि सैल ठेवा, जेणेकरून अमोनियाचा साठा होणार नाही.<br>• ओले आच्छादन टाळा, कारण त्यामुळे रोग आणि अस्वच्छता वाढते.<br>• उन्हाळ्यात आच्छादन वारंवार बदलावे.<br>६. उष्णतेच्या ताणाची लक्षणे ओळखा<br>• हाकरणे, पंख खाली सोडणे, कमी खाद्य सेवन, किंवा सुस्तपणा ही उष्णतेच्या ताणाची लक्षणे असतात.<br>• जर कोंबड्यांना उष्णतेचा ताण जाणवत असेल, तर थंड पाणी, इलेक्ट्रोलाइट्स आणि अधिक वायुवीजन यांची त्वरित व्यवस्था करावी. (तज्ञ पशूवैद्यकाच्या सल्ल्याने उपचार करावेत)<br>या उपाययोजना अवलंबल्यास उष्णतेचा ताण कमी होईल आणि उन्हाळ्यातही कोंबड्यांचे आरोग्य आणि उत्पादन टिकून राहील. |

# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| मेघदूत<br>अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी<br>अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |
|---|---|

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर
दि. : २७.०२.२०२६

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा
सहयोगी संशोधन संचालक,
विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर